**रे.दि.अपील क्र.१६५/२०१९**
CNR - MHST01-002112-2019

## निशाणी क्र.२० खालील आदेश

(रामचंद्र खाशाबा भोईटे मयत वारस विरुध्द नामदेव खाशाबा भोईटे मयत वारस)

रिस्पॉन्डंट क्र.१क व २ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळण्यासाठी हा अर्ज सादर केला आहे.

२) निशाणी क्र.१८ वरील अर्ज व त्यापुष्टयर्थ सादर केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. रिस्पॉन्डंटतर्फे अर्जावर दिलेले म्हणणे वाचले.

३) अपेलंटतर्फे कथन की, रिस्पॉन्डंट क्र.१क शकुंतला गजानन निगडे या नोव्हेंबर–२०२१ मध्ये व रिस्पॉन्डंट क्र.२ विश्वास नामदेव भोईटे हे दिनांक २२/०५/२०२२ रोजी मयत झाले परंतु त्यांच्या मृत्यूची माहिती वेळेत न मिळाल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस उशीर झाला. सदर उशीर माफ होणे गरजेचे असल्याचे कथन केले आहे. रिस्पॉडंटतर्फे हरकत घेऊन उशीर माफीबाबत योग्य कारण दिले नसल्याचा आक्षेप घेतला.

४) अपेलंटच्या कथनाप्रमाणे रिस्पॉन्डंट क्र.१क व २ यांच्या मृत्यूची माहिती उशीरा मिळाल्याने त्यांच्या वारसांना रेकॉर्डवर घेणेस उशीर झाला आहे. रिस्पॉन्डंटतर्फे उशीराबाबत योग्य कारण दिले नसल्याचा आक्षेप घेतला आहे. तरी देखील अपेलंटने दिलेले कारण विचारात घेता तसेच प्रकरणाचे स्वरुप पाहता अपीलाचा गुणदोषावर निकाल होणेकरीता अर्ज मंजुर करणे उचीत होईल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारित.

## आदेश

(१) अर्ज (निशाणी क्र.१८) मंजुर करणेत येतो.

(२) मयत रिस्पॉन्डंट क्र.१क शकुंतला गजानन निगडे व रिस्पॉन्डंट क्र.२ विश्वास नामदेव भोईटे यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला उशीर माफ करण्यात येतो.

NITIN HANMANTRAO JADHAV
Digitally signed by NITIN HANMANTRAO JADHAV
Date: 2024.04.05 13:38:33 +0530

सातारा.
दिनांक – ०५/०४/२०२४.

(नि.ह. जाधव)
जिल्हा न्यायाधीश–३, सातारा